वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कळवा पोलीस स्टेशन ठाणे शहर

J.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** कळवा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0668  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/12/2023 08:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 07/12/2023

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/12/2023

**Time From (वेळेपासून):** 14:13 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:13 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/12/2023  **Time (वेळ):** 07:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/12/2023 08:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गोल्डनमुन को ऑ हौसोसायटी, , बाबसाहेब मेमोरियल हॉस्पिटल, कळवा ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीकष्ण सितारामजी ढोणे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** सितारामजी ढोणे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1952

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 202, गोल्डनमुन कोऑपहो ,सोसायटी, कळवा नाका,कळवा, जिठाणे, कळवा ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 202, गोल्डनमुन कोऑपहो ,सोसायटी, कळवा नाका,कळवा, जिठाणे,कळवा ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8879885651

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाष उमाजी गरूड | | वडील का नाम : उमाजी | 1. कळवा प्रभाग समिती, ,ठाणे महानगरपालिका, जि ठाणे, कळवा ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, डॉ. श्रीकृष्ण सितारामजी ढोणे, वय 71 वर्षे, व्यवसाय-डॉक्टर, राहणार - 202, गोल्डनमुन को.ऑप.हौ. सोसायटी, कळवा नाका, कळवा, जि.ठाणे मो. नं. 8879885651 समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी वरील ठिकाणी माझे परिवारासह रहावयास आहे. माझे स्वतःचे मालकीचे बाबासाहेब मेमोरीयल हॉस्पीटल, या नावाने कळवा येथे हॉस्पीटल आहे. सदर हॉस्पीटलमधून मिळणाऱ्या उत्पन्नाद्वारे माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.

माझे गोल्डन मुन को.ऑप. हौ. सोसायटी कळवा, जि.ठाणे या सोसायटीमध्ये फ्लॅट नं. 202, 203 व 204 असे स्वतःचे मालकीचे तीन फ्लॅट आहेत. सदर फ्लॅटमध्ये माझे स्वतःचे बाबासाहेब मेमोरीयल हॉस्पीटल, कळवा या नावाने हॉस्पीटल आहे. सदर हॉस्पीटलसाठी मी ठाणे महानगरपालिका येथून नळ कनेक्शन घेतलेले असून, त्याचे संयोजन ग्राहक क्रमांक 4011086/00008 4011086/00009 व 10/150 असे आहेत. त्यापैकी संयोजन ग्राहक क्रमांक 10/150 चे दि. 01/08/2020 ते दि. 31/03/2021 पर्यंतचे रु. 400/- पाणी बील मी भरलेले आहे. त्यानंतर मला माझे संयोजन ग्राहक क्रमांक 4011086/00009 या नळ कनेक्शनचे दि. 23/02/2023 रोजी रु 82,192/- रुपयाचे थकित पाणी बील व त्यासोबत पाणी बील थकित रक्कमेबाबतची नोटीस प्राप्त झाली. त्यानंतर मला माझे संयोजन ग्राहक क्रमांक 4011086/00008 या नळ कनेक्शन दि. 24/02/2023 रोजी 1,20,138/- रुपयाचे थकित पाणी बील व त्यासोबत पाणी बील थकित रक्कमेबाबतची नोटीस प्राप्त झाली. परंतु सदर दोन्ही नळ कनेक्शनचा मी वापर केलेला नसल्याने सदरचे बीले हे मला अयोग्य वाटत असल्याने सदर बीलांचे पुनर्विलोकन होण्याकरीता मा. उप अभियंता, पाणी पुरवठा वसुली विभाग, कळवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना मी, दि. 02/03/2023 रोजी लेखी अर्ज दिलेला होता.

सदर अर्जाच्या अनुषंगाने कळवा प्रभाग समिती येथील कर्मचारी श्री. सुभाष गरुड यांनी माझे हॉस्पीटलध्ये येवून तपासणी केली. त्यानंतर त्यांनी मला वेळोवेळी माझे हॉस्पीटलध्ये येवून तसेच श्री. गरुड हे मला वारंवार त्यांचे मोबाईल क्र. 8779057856 यावरून संपर्क करुन बिलाची रक्कम कमी करावयाची असल्यास मला व माझ्या साहेबांना काही तरी दयावे लागेल असे सांगून मला त्यांचे कार्यालयात भेटण्यास येण्यास सांगत होते. त्यानंतर श्री. गरुड यांनी मला संयोजन ग्राहक क्रमांक 4011086/00009 या नळ कनेक्शनचे 01/04/2021 ते 30/11/2023 या कालावधीमधील 96,000/- रु. चे अद्यावत बील दिले आहे.

त्यानंतर दिनांक 05/12/2023 रोजी मी, माझे हॉस्पीटलमध्ये असताना श्री. गरुड हे मला त्यांचे मोबाईलवरुन संपर्क करुन माझे हॉस्पीटलमध्ये मला भेटण्यास आले. त्यावेळी त्यांनी मला पाणी बीलाची रक्कम अदयाप भरली नाही, याबाबत मला विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना, मी दिलेल्या अर्जावर काय केले? याबाबत त्यांना विचारणा केली असता, त्यांनी मला तुमचे दोन्ही मीटरचे एकत्रित पाणी बील 2,16,138/- रु. एवढे होत असून तुम्हाला सदरची रक्कम कमी करुन हवी असल्यास मला व माझ्या साहेबांना 48,000/- रु. दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना सदर रक्कमेची पावती मिळेल अगर कसे? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदर रक्कमेची पावती मिळणार नसल्याचे सांगून सदरची रक्कम ही तुमचे थकित पाणी बिलाची रक्कम कमी करुन देण्याकरीता स्वतःकरीता व त्यांचे साहेबांकरीता असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना विचार करुन सांगतो असे सांगितले असता, त्यांनी मला 'ठिक आहे' असे सांगून उद्या पुन्हा येतो तेव्हा सांगा असे मला सांगितले. सदरबाबत मी माझे ओळखीचे लोकांकडे चौकशी केली असता अशी कोणतीही फी नसल्याचे मला समजले. यावरुन कळवा प्रभाग समितीचे श्री. सुभाष गरुड हे माझी थकित पाणी बीलाची रक्कम कमी करुन देण्याकरीता स्वतः करीता व त्यांचे साहेबांकरीता माझेकडे 48,000/- रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करत असून मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांचेविरूध्द कारवाई होणेसाठी दिनांक 05/12/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरून दिनांक 06/12/2023 रोजी पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांनी दोन पंचासमक्ष सर्व

कायदेशीर बाबींचा अवलंब करून पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांचे सुचनेप्रमाणे पंचांसमक्ष लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांना माझे मोबाईलवरून संपर्क करण्यात आला. परंतु त्यावेळी लोकसेवक श्री.गरूड यांनी फोन रिसिव्ह केला नाही. थोड्या वेळानंतर लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी त्याचे मोबाईलवरून मला फोन केला त्यावेळी आमच्या दोघांमध्ये संभाषण झाले. त्यावेळी मी त्यांना तुमच्याशी माझे थकित बिला संदर्भात बोलायचं होतं असे सांगून त्यांना हॉस्पीटलमध्ये येण्यास सांगितले. त्यानंतर थोड्या वेळाने श्री.गरूड हे माझे हॉस्पीटलमध्ये आले. त्यावेळी आमच्यामध्ये माझे नळाचे थकित पाणी बिला संदर्भात चर्चा झाली व चर्चे दरम्यान श्री.गरूड यांनी मला 'ऑफिसमध्ये साहेबांना भेटून त्यांचेशी सविस्तर बोलून घ्या' असे सांगून ते निघून गेले. त्यानंतर मला पाणी पुरवठा विभाग कळवा प्रभाग समिती येथे पंच क्र. 1 यांचेसह पाठविण्यात आले. मी कळवा प्रभाग समिती येथे पोहचल्यानंतर मी, लोकसेवक श्री. सुभाष गरूड यांना माझे मोबाईलवर फोन करून संपर्क केला असता, लोकसेवक श्री. सुभाष गरूड यांनी मला 'मी दोन मिनिटात आलो' असे बोलून फोन कट केला. त्यानंतर मी, श्री. सोलंकी यांना भेटलो व त्यांचेशी मला देण्यात आलेल्या थकित पाणी बिले व नळ कनेक्शन कट करण्यासाठी दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने चर्चा केली. थोड्या वेळानंतर लोकसेवक श्री.सुभाष गरूड हे सदर ठिकाणी आले व त्यांनी मला लोकसेवक श्री.सोलंकी यांचेपासून थोडे अंतरावर बाजूला घेवून गेले. सदर ठिकाणी श्री.गरूड यांनी माझे प्रलंबित कामाबाबत तसेच दिनांक 05/12/2023 रोजी माझेकडे थकित पाणी बीलाची रक्कम कमी करुन देण्यासाठी मागणी केलेल्या रक्कमेबाबत चर्चा केली. सदर ठिकाणी श्री.सुभाष गरूड यांनी त्याचेकडील असलेल्या डॉक्टरच्या प्रिस्क्रीप्शनच्या कागदाचे मागील बाजूस काळ्या शाईच्या पेनाचे सहाय्याने स्वतःचे हस्ताक्षराने 48,000/- असे आकडयांमध्ये लिहून त्याचे खाली 40,000/- असे लिहून सदरचा कागद मला दाखवून 'आता उच्चारू नका, एवढं करा, तुम्हाला सगळं क्लिअर करून देणार, मार्च पर्यंत क्लिअर करून देणार, आता काहीच बोलायचं नाही, असे बोलल्यानंतर मी त्यांना 'कधी करायचं' असे विचारले असता त्यांनी मला आज करा, संध्याकाळी करा, आता करा, चार वाजेपर्यंत तुम्हाला क्लिअर करून देतो असे बोलून तडजोडीअंती कागदावर लिहिलेले आकडे दाखवून याप्रमाणे लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक श्री.गरूड यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम जमा झाल्यानंतर फोन करून सांगा मला बोलवा मी येतो असे सांगितले. त्यानंतर मी पंचासह पडताळणी पथक माझे हॉस्पीटलमध्ये थांबलेल्या ठिकाणी परत निघून आलो. त्यावेळी पडताळणी दरम्यान घडलेला सर्व घटनाक्रम पंचासमक्ष पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांना सांगितला. लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी पडताळणी कारवाई दरम्यान स्वतःचे हाताने कागदावर लिहून 40,000,/- रूपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांनी दोन्ही पंचासमक्ष मला लोकसेवक यांना द्यावयाच्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी माझे घर खर्चातील 40,000/- रूपये हे लाचेची रक्कम म्हणून हजर केली. त्यानंतर पोनि.श्रीमती राजश्री शिंदे यांनी दोन्ही पंचासमक्ष सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. मी माझेकडील लाचेकरीता द्यावयाचे 40,000/- रूपये हजर केल्याने पोनि. श्रीमती राजश्री शिंदे व सापळा पथकातील कर्मचारी यांनी सापळापूर्व कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक त्या नोंदी व कारवाई करून लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावून ती रक्कम माझे नेसुस पँन्टच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवली व पुढील सापळा कारवाई पार पाडेपर्यंत घ्यावयाचे दक्षतेबाबत तसेच श्री.सुभाष गरूड यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा सविस्तर समजावून सांगून तशा पंचांना व मला सविस्तर सुचना देवून मला माझे शर्टाचे आतमध्ये डिजीटल व्हाँईस रेकांर्डर लावून पंच साक्षीदार यांचेसमवेत हाँस्पीटलच्या माझे कन्सल्टींग रूममध्ये थांबण्याचे सांगून सापळा रचण्यात आला. त्यानंतर बराच वेळ होऊनही लोकसेवक श्री.सुभाष गरूड हे न आल्याने त्यांना मी माझे मोबाईल फोनवरून काँल केला होता. त्यावेळी लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी मला मी हेड ऑफिसला आलो आहे. मला येण्यास उशिर होईल असे सांगितले. त्यामुळे मी, लोकसेवक श्री.गरूड यांची वाट पाहत हाँस्पीटलमध्ये थांबून होतो. परंतु भरपूर उशिर झाल्यामुळे मला पोनि. श्रीमती राजश्री षिंदे यांनी दिलेल्या सुचनेनुसार लोकसेवक श्री.सुभाश गरूड यांना पुन्हा माझे मोबाईल फोनवरून काँल केले असता, त्यांनी माझे काँल उचलले नाही. त्यामुळे पोनि.श्रीमती राजश्री शिंदे व दोन्ही पंच साक्षीदार यांचेशी व माझेशी विचारविनीमय करून सुरू असलेली कारवाईबाबत गोपनियता राखून सापळा कारवाई तुर्तास स्थगित करून आवश्यक असलेल्या पुढील सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता करून सदरची सापळा कारवाई दुसऱ्या दिवशी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दिनांक 07/12/2023 रोजी सकाळी पोनि. श्रीमती राजश्री शिंदे, सापळा पथकासह व पंच साक्षीदार यांचेसह माझे हाँस्पीटल येथे उपस्थित राहून सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले. सर्व सापळापूर्व कार्यवाहीच्या आवष्यक नोंदी घेवून लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावलेली रक्कम माझे नेसुस पँन्टच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवली व पुढील सापळा कारवाई पार पाडेपर्यंत घ्यावयाचे दक्षतेबाबत तसेच श्री.सुभाष गरूड यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा सविस्तर समजावून सांगून तशा पंचांना व मला सविस्तर सुचना देवून

मला माझे हॉस्पीटलमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच साक्षीदार यांचेसमवेत माझे हॉस्पीटलचे कंन्सल्टींग रूममध्ये थांबण्याचे सांगून सापळा लावण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर वेळी पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांनी दोन्ही पंच साक्षीदार व माझेशी विचारविनीमय करून थोडा वेळ लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांचे फोन येण्याची वाट पाहत थांबून राहिलो. परंतु बराच वेळ होऊनही लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी मला संपर्क न केल्याने पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांचे सुचनेवरून श्री.गरूड यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क केला. त्यावेळी मी, लोकसेवक गरुड यांना ''अरे सुभाष येवून जा ना बाबा'' असे बोललो असता त्यांनी ''बरं एक फंक्शन आहे घरी ते झाले की येवून जातो'' असे सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक श्री.गरूड यांचा माझे मोबाईलवर फोन आला. परंतू माझा मोबाईल सायलेंट मोडवर असल्याने त्याचे कॉल कधी येवून गेले ते मला समजले नाही. त्यानंतर पोनि. श्रीमती राजश्री शिंदे यांचे सुचनेनुसार मी, पंचांसमक्ष लोकसेवक श्री.गरूड यांचे मोबाईलवर संपर्क केला असता सदर वेळी श्री.सुभाष गरूड यांनी मला मा. उप अभियंता यांचे नावे एक अर्ज लिहून ठेवण्यास सांगून सदर अर्जामध्ये 'मी एक रिटार्यड माणूस असून एवढी थकबाकीची रक्कम भरू शकत नाही, माझे पाणी बिलामध्ये मला थोडीफार सवलत देण्यात यावी', असे आषय नमुद करुन सदरचा अर्ज लिहून ठेवण्यास सांगून तो अर्ज घेण्याकरीता अर्ध्या तासात हॉस्पिटल मध्ये येत असलेबाबत लोकसेवक श्री.सुभाष गरुड यांनी सांगितले.सदरचे संभाशण देखील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्याप्रमाणे लोकसेवक श्री.सुभाष गरूड हे थोडया वेळानंतर माझे हॉस्पीटलमध्ये आले. त्यावेळी मी, लोकसेवक श्री.गरूड यांचेशी मला सांगितलेल्या अर्जाबाबत तसेच रक्कमेबाबत कमी-जास्त होईल काय? याबाबत चर्चा केली. त्यावेळी मी, लोकसेवक श्री.गरूड यांना याची पावती वगैरे मिळेल काय? असे विचारले असता, त्यावेळी लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी वीसची पावती भेटेल. त्यावेळी मी त्यांना 20 चा चेक देवू का? असे विचारले असता, श्री.गरूड यांनी त्यास होकार दिला. तसेच लोकसेवक श्री.सुभाष गरूड व माझी थकित पाणी बीलाची रक्कम कमी करुन देण्याकरीता चर्चा सुरू असतांना लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी मला त्यांच्या हाताचे इशाऱ्याने खुणवून लाचेच्या रक्कमेची विचारणा केली. त्यावेळी मी, लाचेची रक्कम 40,000/- रूपये असलेला बंडल माझे पॅन्टचे उजव्या खिश्यामधून काढून लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांचे समोर धरली, त्यावेळी त्यांनी लाचेच्या रक्कमेचे बंडल त्यांचे उजवे हातानं स्विकारल्याने मी त्यांना 'मोजून घ्या' असे सांगून त्यांनी पैसे मोजण्यास नकार दिला. त्यानंतर मी त्यांना उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे नावे लिहिलेला अर्ज दिला. सदरचा अर्ज लोकसेवक श्री.सुभाष गरूड यांनी आपल्या ताब्यात घेवून त्यामध्ये माझेकडून स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेचा बंडल त्यामध्ये गुंडाळून ते टेबलावर ठेवून दिले. त्यानंतर मी लाचेच्या रक्कमेचा स्विकार झाल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोनि.श्रीमती राजश्री शिंदे व सापळा पथकाने लोकसेवक श्री.सुभाष उमाजी गरूड यांना पंचासमक्ष 14.13 वाजता लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले व माझे ताब्यातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर घेवुन बंद केला.

तरी माझे दिनांक 05/12/2023 रोजीच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 06/12/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सुभाष उमाजी गरूड, वय - 54, पद - सफाई कामगार, (वर्ग-4), नेमणूक - घनकचरा व्यवस्थापन विभाग (सध्या नेमणूक - कळवा प्रभाग समिती) ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी माझे थकित पाणी बीलाची रक्कम कमी करुन देण्याकरीता 48,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 40,000/- रुपये लाचेची रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्या अनुषंगाने दिनांक 07/12/2023 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सुभाष उमाजी गरूड यांना माझेकडून 40,000/- (चाळीस हजार रुपये) लाचेची रक्कम स्विकारतांना 14.13 वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री. सुभाष उमाजी गरूड, वय 54, पद - सफाई कामगार, वर्ग-4, नेमणूक - घनकचरा व्यवस्थापन विभाग, पाचपाखाडी सध्या नेमणूक - कळवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, जि. ठाणे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
ANITA MARUTI VARADE
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
कळवा पोलीस स्टेशन
ठाणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KANHAIYA PANNALA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):